## नियमित दिवाणी दावा क्र. १८३/२०२५ मधील निशाणी १८ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज तिऱ्हाईत इसम नामदेव ज्ञानू सुर्यवंशी, मदन राघू साळुंखे, तुकाराम नामदेव सुर्यवंशी, लालासो शारामव सुर्यवंशी, हिंदूराव बापू सुर्यवंशी-होगले, संभाजी किसन सुर्यवंशी होगले व कृष्णा विष्णू आबदर यांनी दाखल केला असून अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे :

प्रस्तुत प्रकरणामध्ये न्यायालयामार्फत जाहीर नोटीस प्रसिध्द करणेत आली आहे. सदरची नोटीस ही प्रस्तुत अर्जातील अर्जदार यांना मिळाली, त्यानुसार अर्जदार हे प्रस्तुत दाव्याचे कामी सामील होवून दावा चालविण्याची तयारी दर्शविली आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्यामध्ये अर्जदार यांना वादी क्र.२ ते ८ म्हणून सामील करावे अशी अर्जदार यांनी विनंती केली आहे.

२. वादी व प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जदार यांना अर्ज मंजूर करण्यास व अर्जदार यांना वादी म्हणून सामील करण्यास हरकत नसल्याचे कथन केले आहे.

३. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता,१९०८ आदेश ०१ नियम १० अन्वये दाखल करणेत आला आहे. आदेश ०१ नियम १० अन्वये कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दाव्यामध्ये गुंतलेल्या सर्व प्रश्नांचा परिणामकारकरित्या व पुर्णपणे अभिनिर्णय करुन ते निकालात काढणे न्यायालयाला शक्य होण्यासाठी ज्या व्यक्तींची न्यायालयासमोर हजेरी आवश्यक असेल अशा व्यक्तीला दाव्यात पक्षकार म्हणून समाविष्ट करता येते. म्हणजेच तो व्यक्ती दाव्यात आवश्यक पक्षकार असतो.

५. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द निरंतर ताकीदीकरीता व अतिक्रमीत क्षेत्रचा ताबा मिळणेकरीता दाखल केला असल्याने वादीचा 'दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केले आहे का व अन्य प्रश्न गुंतलेले आहेत. त्रयस्थ इसम यांनी त्यांना दाव्याचे कामी वादी म्हणून सामील होण्यास तयारी दर्शविली आहे. दाव्याचे स्वरुप पाहता दावा मिळकती या

सार्वजनिक स्वरुपाची मिळकत आहे. प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये अनाधिकाराने अतिक्रमण केले आहे अशी वादीची कथने आहेत. जाहीर नोटीसीद्वारे दावा मिळकतीमध्ये ज्यांचे स्वारस्य गुंतले आहे त्यांना दाव्याचे कामी पक्षकार म्हणून सामील होण्याचे कळविले होते. त्यानुसार अर्जदार यांनी वादी म्हणून सामील होण्याची तयार दर्शविली आहे. जर अर्जदार यांचे दावा मिळकतीमध्ये स्वारस्य, हक्क व अधिकार असतील तर निश्चीतच दाव्यातील मिळकतीबाबत प्रश्न निर्णीत करणेस मदत होणार आहे. सबब अर्जदार यांना वादी म्हणून सामील करणयची विनंती मान्य करणे न्यायोचीत होणार आहे. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्जदार यांचा निशाणी १८ वरील अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादी दाव्यामध्ये बदल करुन दुरूस्त प्रत दाखल करण्याची आहे.

PALLAVI MANSING SURYAWANSHI

Digitally signed by PALLAVI MANSING SURYAWANSHI
Date: 2026.03.18 17:41:54 +0530

विटा
दिनांक : २४/०३/२०२६

**(श्रीमती पल्लवी मा. सुर्यवंशी)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, विटा